# सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट, क्विकहिल फाऊंडेशनतर्फे औषधे भेट

**कोल्हापूर :** महापालिकेच्या कोव्हिड केअर सेंटरसाठी श्री सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट कोल्हापूर व क्विकहिल फाऊंडेशन पुणे यांच्याकडून औषधे देण्यात आली. रूकडीकर ट्रस्टचे अध्यक्ष आनंदनाथ सांगवडेकर यांनी उपायुक्त निखिल मोरे व सहायक आयुक्त विनायक औंधकर यांच्याकडे औषधे दिली. महापालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी मदत करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनास प्रतिसाद देऊन श्री सद्‌गुरू विश्वनाथ महाराज रूकडीकर ट्रस्ट कोल्हापूर व क्विकहिल फाऊंडेशन पुणे यांनी (५०० ऑक्सिजन मास्क, १००० आय.व्ही.सेट, १००० सर्जिकल ग्लोव्हज, १००० सिरिंज) इत्यादी औषधे दिली. यावेळी सहायक आयुक्त संदीप घार्गे, रामकाका, विश्ववतीचे अध्यक्ष निरंजनदास सांगवडेकर उपस्थित होते.